अधिक्षक,गट-क या पदावरुन प्रशासन
अधिकारी, गट-ब या पदावर पदोन्नती
देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन आदेश क्र.पसंप्र-२०१८/प्र.क्र.२८४ /पदुम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार) मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ८ मार्च, २०१९

<u>शासन आदेश:-</u>

पशुसंवर्धन विभागातील अधिक्षक (गट-क) (वेतनश्रेणी रु.९३००-३४८००/- ग्रेड पे. ४,३००/- या संवर्गात कार्यरत असलेल्या खालील विवरणपत्रात नमूद कर्मचाऱ्यांना प्रशासन अधिकारी, गट-ब (वेतनश्रेणी रु.९३००- ३४,८००/- ग्रेड पे. ४,४००/-) या पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत असून प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना स्तंभ क्र.४ येथे नमूद ठिकाणी करण्यात येत आहे :-

अ.क्र.	अधिक्षकांचे नांव	निवड केलेला प्रवर्ग	पदोन्नतीनंतर पदस्थापना
१.	२.	३.	४.
१.	श्री. किरकिरे सुनिल दिनकर, अधिक्षक, आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांचे कार्यालय.	खुला	प्रशासन अधिकारी (गट-ब), आयुक्त पशुसंवर्धन,पुणे यांचे कार्यालय (पसं-४)
२.	श्री. पाटील विलास शैनपंडू, अधिक्षक, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय-जळगांव.	खुला	प्रशासन अधिकारी (गट-ब), प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, अमरावती-विभाग, अमरावती.
३.	श्री. म्हात्रे हरिश्चंद्र कान्हू, अधिक्षक, आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांचे कार्यालय.	खुला	प्रशासन अधिकारी, गुणनियंत्रण प्रयोगशाळा, गोरेगांव, मुंबई.
४.	श्री. मोमले गोरक्षनाथ बालाजी, अधिक्षक, प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, औरंगाबाद यांचे कार्यालय.	खुला	प्रशासन अधिकारी (गट-ब), आयुक्त पशुसंवर्धन,पुणे यांचे कार्यालय (पसं-८)
५.	श्री. सोनावणे विकास बाळू, अधिक्षक, प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त पुणे यांचे कार्यालय.	अनु.जाती	प्रशासन अधिकारी (गट-ब), प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, लातूर-विभाग, लातूर.
६.	श्री. आडसूळ साहेबराव भगवान, अधिक्षक, आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांचे कार्यालय.	इ.मा.व.	प्रशासन अधिकारी (गट-ब), राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र, गोखलेनगर, पुणे.
७.	श्री. कदम जगन्नाथ नानासाहेब, अधिक्षक, आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांचे कार्यालय.	खुला	प्रशासन अधिकारी (गट-ब), पशुजैव पदार्थ निर्मिती संस्था, औंध, पुणे.
८.	श्री. धारेराव प्रकाश जयसिंग, अधिक्षक, आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांचे कार्यालय.	खुला	प्रशासन अधिकारी (गट-ब), प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन,पुणे-विभाग, पुणे.

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ मध्ये दि.४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णया विरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. याबाबत विधी व न्याय विभागाने दि.२८/१२/२०१७ रोजी खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. तूर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवा जेष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधीन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवा जेष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते दिनांक २५/५/२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी, अशा सूचना सा.प्र.वि./कार्यासन १६-ब ने दिनांक २९/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिल्या आहेत.

२. सा.प्र.वि./कार्यासन १६-ब यांनी उपरोक्त दि. २९/१२/२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार सदर पदोन्नत्या तदर्थ व पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निवळ तात्पुरत्या स्वरुपात सेवा ज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञेय याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्याबाबत सा.प्र.वि./१६ब यांनी दिनांक २९/१२/२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सुचना नुसार देण्यात येत आहेत.

३. प्रशासन अधिकारी (गट-ब) या पदावर पदोन्नती नंतर पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी संबधित नियंत्रण अधिकारी यांनी उपरोक्त अधिका-यांना तात्काळ कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करावी. तसेच संबधित अधिका-यांनी पदोन्नती नंतर पदस्थापनेच्या पदावर रुजू झाल्याचा अहवाल vinod.mendhe@nic.in या ईमेल संकेतस्थळावर सादर करावा.

४. संबंधित अधिकाऱ्याने पदोन्नतीच्या पदावर हजर न होता लोकप्रतिनिधी मार्फत पदस्थापनेत बदल करण्याबाबत शासनावर दबाव आणल्यास ते म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतूदीनुसार शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र ठरतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०३०८१५१९१०८५०१ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Vijay K. Chaudhari
Date: 2019.03.11 10:44:58 +05'30'

(विजय चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. आयुक्त पशुसंवर्धन,महाराष्ट्र राज्य, औंध,पुणे-०७.
२. सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. सहआयुक्त पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, औंध,पूणे.
४. सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग, औंध,पूणे.
५. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त,मुंबई/ अमरावती/लातूर/पुणे/नाशिक/औरंगाबाद

६. उपआयुक्त पशुसंवर्धन (गुणनियंत्रण), गोरेगांव, मुंबई-६५.
७. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त,ठाणे/पूणे/लातूर/ अमरावती/जळगांव/औरंगाबाद
८. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,जिल्हा परिषद, ठाणे/पुणे/लातूर/अमरावती/ जळगांव/औरंगाबाद.
९. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर.
१०.अधिदान व लेखा अधिकारी, बांद्रा, मुंबई
११.जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे/पुणे/लातूर/अमरावती/जळगांव/औरंगाबाद
१२.संबंधित अधिकारी, द्वारा आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,पुणे.
१३.निवडनस्ती-१.